॥ शरीरमाद्यम खलुधर्मसाधनम् ॥

नाशिक इंजिनिअर्स सोशल वेलफेअर असोसिएशन, नाशिक, संचलित

# नाशिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक

रजि. क्र.महाराष्ट्र /७९११/०३ नाशिक दिनांक १०/०३/२००३



ध्येय : कर्तृत्वसंपन्न शतायुषी जीवनाची गुरुकिल्ली देणाऱ्या आदरणीय सर विश्वेश्वरैया यांची प्रेरणा घेऊन, त्यांच्याप्रमाणे देशाच्या विकासासाठी अहोरात्र काम करणाऱ्या अभियंत्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याचे संवर्धन करणे.

जिमखाना नाशिक वार्ता (त्रैमासिक) वर्ष-1ले (अंक दुसरा –फेब्रुवारी २०२२)(Only Digital Copy)



नाशिक इंजिनिअर्स जिमखाना नाशिक चे एक महत्वाचा निर्णय......जिमखान्याची Website चे उदघाटन/लाँचींग जिमखाना अध्यक्ष डॉ. संजय बेलसरे तथा मुख्य अभियंता जलसंपदा नाशिक याचे हस्ते करण्यात आले.जगदीश महाजन उपविभागीय अधिकारी जलसंपदा, नाशिक व प्रथमेश जगदिश महाजन यांनी website तयार केली.



मा.अध्यक्ष याचे हस्ते स्पर्धेचे उदघाटन होवुन नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक तर्फे इंजिनिअर्स टेनिस बॉल क्रिकेट सामने दि 27/11/2021 रोजी गोल्फ क्लब मैदान नासिक येथे संपन्न झाले. स्पर्धेत जलसंपदा, सार्वजानिक बांधकाम,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,जिल्हा परिषद व नाशिक महानगरपालिका नाशिक या संघातील इंजिनिअर्स यांनी सहभाग घेतला.

# अभियंत्यांच्या तंदुरूस्तीसाठी नाशिक ईंजिनिअर्स जिमखाना, नाशिक

## नाशिक ईंजिनिअर्स सोशल वेल्फेअर असोसिएशन नाशिक-

## कार्यकारीणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ईंजि.श्री.देवदत्त मराठे | सेवा निवृत्त सचिव सार्व.बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई | संस्थापक अध्यक्ष |
| २ | डॉ.श्री.संजय बेलसरे | मुख्य अभियंता,जलसंपदाविभाग,उत्तर महाराष्ट्र प्रदेश,नाशिक | अध्यक्ष |
| ३ | ईंजि.श्री.पदमाकर भोसले | मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक | सहअध्यक्ष |
| ४ | ईंजि.श्रीमती अलका अहिरराव | अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नाशिक | उपाध्यक्ष |
| ५ | ईंजि.श्री.प्रशान्त सोनवणे | अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक | उपाध्यक्ष |
| ६ | ईंजि.श्री.सुनिल खुने | सेवा निवृत्त शहर अभियंता नाशिक महानगरपालिका | उपाध्यक्ष |
| ७ | ईंजि.श्री.सागर शिंदे | कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक | कार्याध्यक्ष |
| ८ | ईंजि.श्री.एकनाथजी बागडे | सेवा निवृत्त उप अभियंता जलसंपदा विभाग नाशिक | कोषाध्यक्ष |
| ९ | ईंजि.श्री.प्रविण गायकवाड | सेवा निवृत्त अधीक्षक अभियंता जलसंपदा विभाग | संचालक |
| १० | ईंजि.श्री.ल.गो. जोशी | सेवा निवृत्त उप अभियंता जलसंपदा विभाग नाशिक | संचालक |
| ११ | ईंजि.श्री.समिर रकटे | अभियंता, महानगरपालिका नाशिक | संचालक |
| १२ | ईंजि.श्री.जयंत भदाणे | सेवा निवृत्त उप अभियंता सार्व.बांधकाम विभाग,नाशिक | संचालक |
| १३ | ईंजि.श्री.संदेश शिंदे | उप अभियंता,महानगरपालिका नाशिक | संचालक |
| १४ | ईंजि.श्री.एच सी शेख | शाखा अभियंता ,जिल्हा परीषद नाशिक | संचालक |
| १५ | ईंजि.श्री.जयंत अदवडे | शाखा अभियंता ,भारत संचार निगम नाशिक | संचालक |
| १६ | ईंजि.श्री.संजय वाघ | शाखा अभियंता ,महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नाशिक | संचालक |
| १७ | ईंजि.श्री.रविंद्र कहाणे | सेवा निवृत्त उप अभियंता जलसंपदा विभाग नाशिक | सचिव |

**संस्थेचे कार्य चालविण्यासाठी आपल्याकडून स्वेच्छेने आर्थिक मदत तसेच वर्गणी रक्कम भरणे अपेक्षित आहे. आपली अर्थिक मदत जिमखान्याचे खालील बँक खात्यात जमा करावी ही विनंती**

बँकेचे नांव - बँक ऑफ बडोदा

शाखा - गोल्फ क्लब शाखा, नाशिक

बचत खाते क्रमांक - 17660100016811

आय एफ एस सी कोड - BARB0GOLFCL

Fifth character is zero

येथे ऑनलाईन अथवा धनादेशाद्वारे जमा करू शकता.

ईंजि.एकनाथ बागडे — कोषाध्यक्ष

ईंजि.रविंद्र कहाणे — सचिव

नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक

## संपादकीय

केंद्र व महाराष्ट्र राज्य शासनाने क्रिडा धोरण सुटसुटीत केलेले असुन क्रीडा धोरणाची फलश्रुती व क्रीडा विकासाची दिशा ही त्यामुळे दिसुन येत आहे. परंतु यात अधिक सुधारणा होणे आवश्यक आहे. खेळाडुंचा सहभाग व त्यांची कार्यक्षमता याबाबत विषेश प्रयन्न करणे आवश्यक आहे.

क्रीडा धोरणात **'सर्वांसाठी खेळाद्वारे सुदृढता'** हा केंद्रबिंदू ठरवण्यात आला होता व आबालवृद्ध नागरिकांमध्ये शारीरिक सुदृढता आणि याद्वारे आरोग्यसंपन्न कार्यक्षम जीवनाचे महत्व त्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना क्रीडा धोरणात सुचविण्यात आली होती. राज्याचे क्रीडा धोरण ठरवितांना क्रीडा व युवक कल्याण यांच्यासाठी खालील महत्त्वाच्या बाबी विचारात घेण्यात आल्या होत्या.

### महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरणातील महत्वाच्या बाबी

१. शालेय शिक्षण व क्रीडा
२. क्रीडा विषयक पायाभूत सुविधांची निर्मिती
३. खेळांसाठी ज्यादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे
४. क्रीडा सहिता तयार करणे
५. शाळांचा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग
६. शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन कार्यपद्धती
७. क्रीडा प्रबोधिनी.
८. अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना
९. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी विशेष गुण सवलत
१०.शालेय क्रीडा स्पर्धा
११. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान.
१२. शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता
१३. क्रीडा महोत्सवाचे आयोजन
१४. स्पोर्ट्स नर्सरीची स्थापना
१५. क्रीडा वाङ:मय निर्मिती, क्रीडा वस्तु संग्राहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना
१६. क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी.
१७. क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन
१८. क्रीडांगणाचे आरक्षण.
१९. क्रीडा अभियान
२०. क्रीडा साहित्य अनुदान
२१. खेळाडूंसाठी स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य.
२२. शालेय विद्यार्थ्यामध्ये योगासनाचे महत्व जागविणे
२३. राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करण

२४. आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती
२५. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना
२६. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे
२७. आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना

अशा अनेक बाबीचा विचार करुन भारतीय खेळ व इनडोअर खेळ तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे , वयोवृद्ध खेळाडू व कुस्तीगीरांना मानधनात वाढ , स्पर्धा अनुदानात वाढ करणे, मॅरेथॉन स्पर्धा आयोजन ,खेळाडुंच्या मानधनात वाढ ,राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याचे सुचित केले आहे.

तसेच आऊटडोअर स्पोर्ट्स, अॅडव्हेन्चर व वॉटरस्पोर्ट्स,महाराष्ट्र स्टेट अॅडव्हेन्चर स्पोर्ट्स सेंटरची स्थापना करणे ,साहसी खेळांची क्रीडा सुविधांची निर्मिती करणे ,साहसी खेळांच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन ,साहसी क्रीडा पुरस्कार ,साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्था व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे ,साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थाना क्रीडा साहित्यासाठी अनुदान देणे अशा तरतुदी करुन क्रीडा संस्कृती सुगम व सुबत्तापुर्ण करणे असेही नियोजन केले आहे.

विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरुस्ती, आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडा विषयक उपक्रमांसाठी सहाय्य, राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना,खेळाडूंसाठी गौरव व प्रोत्साहनपर बक्षिसे तसेच एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन , महाराष्ट्र राज्य क्रीडा पारिषदेमार्फात क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे ,आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक साहाय्य करणे,आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क, इ करिता आर्थिक सहाय्य करणे ,खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता ,क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग करुन घेणे बाबतही नियोजन शासनाकडुन करणेत आले आहे.

परंतु नाशिक ईंजिनिअर्स सोशल वेल्फेअर असोसिएशन नाशिक संचलित नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक ही आपली स्वतंत्र स्वायत्त संस्था असुन शासनाचे अनुदान संलग्न नाही. त्यामुळे आपली संस्था स्वविकसित उपलब्ध निधीच्या अनुषंगाने/ स्वखर्चाने क्रिडा स्पर्धांचे नियोजन करत असते. यासाठी मा.अध्यक्ष व उपाध्यक्ष व कार्यकारीणीचे सर्व सदस्य प्रयत्नशिल आहेत. यासाठी नाशिक ईजिनिअर्स जिमखाना नाशिक अंतर्गत सर्व सदस्य बंधु भगिनींनी त्यांच्या आवडीनुसारच्या क्रिडा प्रकारात मेहनत घेवुन खेळासा विकास व त्यातुन मिळणारा भरपुर आनंद मिळवावा असे मी विनम्र आवाहन करतो.

यासाठी विशेषत्वाने क्रीडा संस्कृती रुजविणे आवश्यक आहे. क्रिडा संस्कृती रुजविणे रुजवायची म्हणजे नक्की काय करायचे? जिमखान्यातील प्रत्येक सदस्यांकडे /घरोघरी मुलांपर्यंत पोहचण्याचा, त्यांच्यापर्यंत खेळ नेण्याचा सर्वात आधी प्रयत्न झाला पाहिजे. मुलामध्ये चपळाई, काटकपणा आदी गुणधर्म निसर्गतःच असतात. तसेच त्यांची मेहनत घेण्याची तयारी असते. त्यांच्यात वेगळीच जिद्द असते. गुणवान खेळाडू घडण्यासाठी आणखी काय पाहिजे?

परंतु, त्यांच्यातील खेळाडू शोधणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांना योग्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यासाठी नाशिक ईंजिनिअर्स जिमखाना क्रीडासंबंधी योग्य ती व्यवस्था उभारणी करीत आहे.परंतु यासाठी सर्व सदस्यांचा सहभागाचे धोरण अपेक्षित आहे.

जिमखान्यातील सदस्य ,तरुण सदस्य व त्यांचे मुलांमध्ये लहानपणापासूनच खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी शालेय स्तरापासून प्रयत्न केले गेले पाहिजेत. तसे प्रयत्न आताही होत आहेत, पण त्यात अधिक गती, सुसूत्रता आली पाहिजे. आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या, पण चांगले खेळाडू होण्याची क्षमता असलेल्या खेळाडूंना खेळांसाठी लागणारी साधने, लागणारा सकस आहार या गोष्टी उपलब्ध करून देण्यावरही भर देणेही खूप आवश्यक आहे. सातत्याने स्पर्धांचे आयोजन केल्यास प्रतिभावान खेळाडूंचा लवकर शोध घेतला जाऊ शकेल, जेणेकरून त्यांना चांगल्या दर्जाच्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनात सराव करण्याची कमी वयातच संधी मिळू शकेल.

शरीरातील कमकुवत पणा कमी करून पुढे वाढणे तसेच शारीरिक आणि मानसिक दृष्टया विकास करणे यासाठी प्रत्येक सदस्याने किमान एकातरी क्रिडा प्रकारात सहभाग घेवुन संस्थेचे ध्येय साध्य करण्यासाठी कटीबध्द होणे आवश्यक आहे.

तसेच सन्माननिय अध्यक्ष यांचे मार्गदर्शनात सदरची संस्था ही सन २०२२ मध्ये अनेक संकल्प घेवुन कार्यरत आहे. .धन्यवाद

या त्रैमासिक अंकात मा. अध्यक्षांनी त्यांचे अध्यक्षीय मनोगतामध्ये संस्थेच्या सद्यस्थितीबाबत विस्तृत विवेचन केले आहे. सर्व सभासदांना नववर्षाच्या शुभेच्छा.......

जगदीश व महाजन ,
सेवा निवृत्त अभियंता

**खेळात पुढाकार घेणे हेच खरे खिलाडुवृत्तीचे प्रथम प्रतिक आहे.**



सर्व अभियंता बंधु भगिनींना सप्रेम नमस्कार ,

सन २०२१ संपलेले असुन सन २०२२ मध्ये नाशिक जिमखाना २०व्या वर्षात पदार्पण करीत आहे. विशीच्या तरुणासारखे जिमखान्याचे नवतारुण्य बहारत असुन जिमखान्यातील सर्व सदस्य नवलाईने व आनंदाने जिमखान्याच्या प्रत्येक कृतीत व खेळात भाग घेण्याच्या प्रयत्न करतात ही एक मोठी आनंदाची बाब आहे.

नाशिक ईंजिनिअर्स सोशल वेल्फेअर असोसिएशन नाशिक संचलित या संस्थेची वाटचाल माझ्यासह सर्व पदाधिकारी,उपाध्यक्ष व कार्यकारीणी सदस्य तसेच सर्व सदस्य बंधु भगिनीं या त्यांच्या आवडीच्या क्रिडा प्रकारात तसेच सामुहिक सहल व एकत्रित बैठकींना उपस्थित राहुन भाग घेतात हा मोठा आनंददायक सोहळा प्रत्येक वेळेस ठरतो. कारण या प्रसंगी सर्व सभासद हिरीरीने जमा होवुन एक प्रकारचे आनंदमय गेट ट गेदर होत असते. सर्वांना अभिवादन .

जिमखाना स्थापन करणे यात मुळात क्रिडा व शारीरीक व्यायाम करणे. खेळाडुला फिटनेस फारच महत्वाचा ठरतो तसेच स्पर्धा म्हटली की युध्द व वरचढ ठरण्यासाठीची जिद्द एक आनंदायक चुरस निर्माण होवुन यात सामाजिक एकता व एकात्मता साधणे व शिस्तीसह आरोग्याचे रक्षण करणे हा आहे. यात आतापर्यन्त नाशिक जिमखाना यशस्वी झालेला आहे.

परंतु यात अधिक सुधारणा वेळोवेळी करणे तसेच प्रगतीपर नाविण्यपुर्ण खेळ व स्पर्धा घेणे यासाठी आर्थिक व शारीरीक पाठबळ पण वाढणे व अद्ययावत होणे गरजेचे आहे. त्यासाठी जिमखाना नविन उपक्रम करणे व व्यवस्थापनांस चालना देणे साठी करणेसाठी संस्थेस आर्थिक मदत आवश्यक आहे. यासाठी निधी संकलन साठी संस्थेने हिंदी चित्रपट सृष्टीतील मान्यवर गायक (Bollywood Singer with classical touch ) यांचा गायनाचा कार्यक्रम करणे व रुपेरी पडदयावरील प्रसिध्द सिलीब्रीटी यांना आमन्त्रित करण्याचे नियोजन येत्या काही दिवसात करण्याचे नियोजन आहे, सदरचा कार्यक्रमास्थळी Screen वर जाहीराती दाखविण्यात येणार आहे.इच्छुक खाजगी व्यवसायिक संस्थांनी तसेच कंत्राटदार/ ठेकेदार अथवा संघटना यांना जाहीरात करावयाची किंवा द्यावयाची असल्यास त्यांनी कृपया नासिक ईंजिनिअर्स जिमखाना नाशिकशी तात्काळ संपर्क साधावा ही सर्वांना विनंती. यामुळे संस्थेस सहजतेने काम करुन सर्व सभासदांचा आनंद व्दिगुणित करणे शक्य् होईल् .

जिमखाना सदर निधीचा काही वापर सामाजिक कामे व Covid-19 Relief Fund साठी करण्यात येईल असा नाशिक ईंजिनिअर्स् जिमखाना, नाशिक यांचा सन २०२२ मधील मोठा संकल्प आहे.तरी सर्वानी यांस प्रतिसाद देवुन या कार्यांस हातभार लावावा अशी विनंती करणेत येत आहे.

संस्थांनी किंवा सभासदांनी त्यांचे वर्गणी व देणगी द्यावी असेही मी आवाहन करतो आहे.

अभियंता म्हटले की, अचूकता, दर्जा व वेळेची बंधने हे आलेच परंतु या वेळापत्रकात स्वत:साठी व कुटूंबासाठी सुद्धा वेळ दिलाच पाहीजे. स्वत:साठी वेळ देणेसाठी स्वत:चे शरीर तंदुरूस्त व मन प्रसन्न तसेच निकोप राहणे आवश्यक आहे. या शरीराच्या निकोपतेमुळे अभियंत्यांच्या कार्यपध्दतीवर तसेच जिवन शैलीवर चांगला प्रभाव पडुन कार्यक्षमतेसह गतीमान कार्यवाही व प्रकल्पपुर्तीसाठीचे सकारात्मक साहचर्य जुळुन येते या हेतुनेच संस्थापक अध्यक्ष ,मी व माझे पदाधिकारी आधीच ओळखुन स्थापित संस्थेचे कामकाज करणेत येत आहे.

शारीरीक व मानसिक लाभ मिळणेसाठी सर्व सभासदांनी जिमखान्याच्या प्रत्येक कृतीत भाग घ्यावा.कारण सर विश्वेश्वरैय्या यांची प्रेरणा घेऊन देशाच्या विकासासाठी रात्रंदिन काम करणाऱ्या अभियंत्यांच्या व त्यांच्या कुटूंबियांच्या आरोग्याचे संवर्धन करण्याचे ध्येय संस्थेचे आहे.

आपल्या संस्थेत जलसंपदा, नाशिक महानगरपालिका, जिल्हा परीषद,भारत संचार निगम ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, टाऊन प्लानिंग, सार्वजानिक बांधकाम विभाग मधील शासकीय अभियंते सभासद आहेत.सर्व विभागांना मी पुनश्च आवाहन करतो की प्रत्येक विभागातील सर्वच अभियंता यांनी नाशिक जिमखान्याचे सभासदत्व घ्यावे व क्रिडा प्रक्रियेत सर्वांगिण विकास साधावा.

आपल्या संस्थेमार्फत विविध क्रीडा स्पर्धा, व्याखाने व दरवर्षी वर्षा सहल आयोजित करण्यात येते. सामुहिक धावणे या प्रकारात ‘नाशिक रन” या स्पर्धेतही भाग घेण्यात येतो.यामध्ये सन २०२२ या सालात अधिक सुधारणा करण्याचा मानस आहे.

चरीतार्थ करुन क्रिडा व विविध लोकोपयोगी उपक्रमांत सहभाग घेण्यास आपली संस्था सर्व सभासदांना संधी देते.यामुळे सभासदांचा उत्साह वाढुन कार्यक्षमता वाढल्याचे दिसुन येते टीमवर्क करण्याचे साहचर्य जुळुन येते.

यामुळे नौकरी करतांना यांची छाप त्यांच्या कार्यक्षमतेवर पडते असा मला अनुभव आलेला आहे.

मी पुन्हा आवाहन करतो आपल्या संस्थेने नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक वेब पोर्टल सर्व सभासदांना उपलब्ध करुन दिली आहे. यामध्ये सर्व सभासदांनी क्रिडा व ज्ञान विषयक माहिती व फोटोस तसेच व्हिडिओज जमा करावे.http://engineersgymkhana.org हा आपला अधिकृत पोर्टल आहे. यांचा सर्वांनी लाभ घ्यावा.

तसेच सर्व सभासदांना नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक व्दारे जिमखाना Digital Magzine (Quarterly ) उपलब्ध करुन देत आहे. यामध्ये विविध क्रिडा माहिती तसेच अभियात्रिकी माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार असुन सदरचे मासिक हे केवळ वेब साईटवर उपलब्ध होणार आहे.सर्व सभासदांनी त्यांचा लाभ घ्यावा  अशी मी विनंती करतो. मान्यवर कार्यकारीणी सदस्यांनी हा घेतलेला निर्णय हा महत्वाचा व सभासदाभिमुख आहे.

खेळाचे फायदे अनेक आहेत. बंधन, धैर्य, शिस्त, गटामध्ये काम करणे हे शिकवतात तसेच निरोगीतत्वासह आत्मविश्वास वाढ करतात. खेळ व क्रिडा अनेक रोगांपासुन सुरक्षित राहण्यासाठी प्रतिकारशक्ती शरीरात तयार होवुन  मदत मिळते व शारीरिक बळ देण्यासह मानसिक सामर्थ्य देते.

दोन दशक पुर्ती करणारी संस्था व प्रामाणिक कार्यकारीणी सदस्य यांचा निर्णय व आदेश अंतिम राहतात व सर्व कार्यकारीणी ही सभासदाभिमुख आहे. तरी सर्व सभादांनी यांचा यांचा लाभ घ्यावा .

सदर मनोगत हे प्रथम असुन सर्वसाधारणपणे मी संस्थेची सद्यस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मला अधिक पुरोगामी बदल करणे आवश्यक वाटत आहे. याबाबत पुढील बैठकांमध्ये सारासार निर्णय होतील. सदरच्या डिजिटल त्रैमासिक अंकाचा लाभ घ्यावा.

सर्व सभासदांना शुभेच्छा.......खेलो ईंडिया खेलो

डॉ संजय बेलसरे
अध्यक्ष
नाशिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक



# सार्वजनिक ठिकाणी दिव्यांगांना 'मुक्त' विहार

## सुगम्य भारत योजना : नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपंगस्नेही सुविधांची निर्मिती

**जागतिक अपंग दिन विशेष**

**नाशिक : किरण ताजणे**

देशात एकूण लोकसंख्येच्या तीन टक्के व्यक्ती दिव्यांग आहेत. दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक व सार्वजनिक ठिकाणी सोयी - सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारकडून 'सुगम्य भारत योजना' राबविण्यात येत आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीही उपलब्ध करून देण्यात येतो. 'सुगम्य' योजनेंतर्गत नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाने २५ सार्वजनिक ठिकाणी अपंगस्नेही सुविधा निर्माण केल्या आहेत. त्यामुळे या सार्वजनिक ठिकाणी दिव्यांगांना 'मुक्त' विहार करता येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिव्यांगांसह ज्येष्ठ नागरिकांसाठी सार्वजनिक ठिकाणी विशेषत: शासकीय कार्यालयांमध्ये अडथळाविरहित वातावरण निर्माण करण्याचे आदेश केंद्र शासनाला दिले आहेत. त्यानुसार देशभरात केंद्राकडून सुगम्य भारत योजना राबविली जात आहे. या योजनेसाठी महाराष्ट्रातील नाशिक, नागपूर, औरंगाबाद, पुणे या चार जिल्ह्यांची निवड करण्यात आली होती. नाशिकमधील २५ सार्वजनिक ठिकाणे निश्चित करून तिथे अपंगस्नेही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नाशिकच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सिद्धार्थ तांबे व सहायक अभियंता अभिजित शेलार यांनी दिव्यांगांसाठी 'बॅरिअर फ्री एन्व्हायर्न्मेंट फॉर द पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज'ची निर्मिती केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वाहनतळापासून मुख्य इमारत तसेच इमारतीच्या आवारात दिव्यांगांना मुक्त विहार करण्यासाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. त्यासाठी सुमारे तीन कोटींचा खर्च आला आहे.

सार्वजनिक ठिकाणी टेक्स्टाईल फरशा बसविल्याने दिव्यांगांना पायी चालण्यास समस्या येत नाहीत. तसेच दिशा समजण्यासाठी ब्रेल लिपीवर आधारित दिशादर्शक फलक असून, ते फलक ऑडिओ रेकॉर्डिंगसह कनेक्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित ठिकाणी फिरणे दिव्यांगांना सुकर होणार आहे. स्वच्छतागृहात दिव्यांगांसाठी काही बदल करण्यात आले आहेत. विशिष्ट हँडल, बसण्याची व्यवस्था आणि दोन दरवाजांची निर्मिती करण्यात आली आहे. बेसिनही विशिष्ट उंचीवर बसविण्यात आले आहे, तर जिन्यात विशिष्ट ग्रिल लावण्यात आले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तींइतकाच दिव्यांग व्यक्तींचा वावर सार्वजनिक ठिकाणी सुलभ झाला आहे.



### नाशिक पीडब्ल्यूडीला आज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान होणार

दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळावे, यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या 'सुगम्य भारत योजने'च्या अंमलबजावणीत नाशिक सार्वजनिक बांधकाम विभाग अव्वल ठरले आहे. दादासाहेब फाळके स्मारकातील सुविधांसाठी केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार - २०२० नाशिक पीडब्ल्यूडीला जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवारी (दि. ३) जागतिक अपंग दिनी दिल्ली येथे होणार आहे.

### या ठिकाणी अपंगस्नेही सुविधा

फाळके स्मारक, बिटको रुग्णालय, जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय, आदिवासी मुलांचे वसतिगृह, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरटीओ कार्यालय, मुला - मुलींचे बालसुधारगृह, सामाजिक न्याय भवन, दुग्ध नियंत्रक कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, मुक्त विद्यापीठ, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, शासकीय आयटीआय, जिल्हा रुग्णालय, नाशिक तहसील कार्यालय, शासकीय कन्या शाळा, नाशिकरोड पोलिस ठाणे, जिल्हा क्रीडा संकुल, संदर्भ रुग्णालय, जिल्हा परिषद, ठक्कर बसस्थानक.

**Barrier free Environment For the Person's With Disabilities.**

**नाशिकच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. सिध्दार्थ तांबे व सहाय्यक अभियंता श्री. अभिजित शेलार यांनी दिव्यांगां साठी मुक्त विहाराच्या सुविधा वाहन तळावर पुरविणेबाबतच्या केलेल्या केंद्र शासनाच्या सुगम्य भारत योजनेच्या अंमलबजावणीत राष्ट्रीय पुरस्कार सन २०२० नाशिक सा.बा विभागांस प्राप्त झाला असून मा.राष्ट्रपती यांचे हस्ते प्रदान करण्यात आला प्रसंगी श्री. तांबे साहेब व सहकारी ......**

**नाशिक ईजिनिअर्स जिमखाना नाशिक व्दारे अभिनंदन व कौतुक**

.



## नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक तर्फे

## इंजिनिअर्स टेनिस बॉल क्रिकेट सामने दि 27/11/2021 रोजी गोल्फ क्लब मैदान नासिक येथे पार पडले.

1.स्पर्धेत जलसंपदा ((WRD)),सार्वजानिक बांधकाम((PWD)),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ((MJP)),जिल्हा परिषद ((ZP)) व नाशिक महानगरपालिका नाशिक((NMC)) या संघातील इंजिनिअर्स यांनी सहभाग घेतला.

2.पहीला सामना (MJP) व (WRD) यांच्यात झाला,(MJP) ने 8 ओव्हर मध्ये 4 बाद 23 धावा केल्या.तर (WRD) ने 3 ओव्हर मध्येच 3 बाद 29 धावा केल्या,(WRD) 7 विकेट राखून विजयी झाली.

3.दुसरा सामना (PWD) व (NMC) यांच्यात झाला,(PWD) ने 8 ओव्हर मध्ये 4 बाद 48 धावा केल्या. तर (NMC) 4 ओव्हर मध्ये 3 बाद 48 धावा केल्या.,(NMC) 7 विकेट राखून विजयी झाले.

4.तिसरा सामना (WRD) व (ZP) यांच्यात झाला,(WRD) प्रथम फलंदाजी घेत 8 ओव्हर मध्ये 1 बाद 125 धावा केल्या. (ZP) ने 8 ओव्हर मध्ये 5 बाद 51 धावा केल्या .
(WRD) 64 धावांनी जिंकली.

5.अंतिम सामना (NMC) व (WRD) यांच्यात झाला,
(WRD) ने प्रथम फलंदाजी घेत 8 ओव्हर मध्ये 5 बाद 89 धावा केल्या .(NMC) ने 8 ओव्हर मध्ये 7 बाद 47 धावा केल्या (WRD) 42 धावा नी विजयी झाले .

## फिरता विजयी चषक जिमखाना अध्यक्ष इंजि. संजय बेलसरे यांचे हस्ते (WRD) टिम ला देऊन सन्मानित करण्यात आले. टीमचे अभिनंदन

- **समीर रकटे व प्रविण गायकवाड यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला**

- **आर्यन मॅंन प्रसाद पाटील यांना सन्मानित करण्यात आले**

**प्रमुख उपस्थिती:-सर्वश्री.**

प्रकाश भामरे से नि सचीव (WRD),नारायण घुगे सेनि का.सं (WRD), नितीन वंजारी शहर अभियंता (NMC), उत्तम पवार सेनि शहर अभियंता (NMC), R k पवार सेनि अ.अभियंता,(NMC),प्रविण गायकवाड सेनि अ अभियंता (WRD), गिरीश संघानी अ अभियंता(WRD),, राजेश गोवर्धने का अ (WRD), मोहन शेलार का अ (WRD),सुबोध मोरे का अ (MJP), ल गो जोशी सेनि उविअ,w rd, एकनाथ बागडे सेनि उविअ (WRD),,दिलीप काळे सहा अभि1(WRD), तुषार खैरनार उप अभि (WRD),प्रमोद कुलकर्णी उप अभि (WRD),, संदेश शिंदे उप अभि,(NMC), रविद्र बागुल उप अभि (NMC),, जयंत भदाणे उपविअ (PWD), समीर रकटे अभियंता (NMC), h c शेख अभियंता (ZP), संजय वाघ अभियंता (MJP), रविंद्र कहाणे उपविअ (WRD),प्रथमेश महाजन web designer
आयर्न मॅंन प्रसाद पाटील.........

## क्रिकेट सामने व वेब लॉंचिंग काही क्षणचित्रे















नाशिक ईजिनिअर्स जिमखाना नाशिक व्दारे अभिनंदन व कौतुक



हॅमबर्ग (जर्मनी) येथे दि.29ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या IRONMAN triathlon' चे आव्हान ईजि.प्रसाद पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.त्यांचा सत्कार मा.अध्यक्ष ,नाशिक ईजिनिअर्स जिमखाना नाशिक डॉ संजय बेलसरे यांच्या हस्ते करण्यात आला .

हॅमबर्ग (जर्मनी) येथे दि.29ऑगस्ट 2021 रोजी झालेल्या IRONMAN triathlon' चे आव्हान ईजि.प्रसाद पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर अत्यंत खडतर आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पूर्ण करावी लागणारी स्पर्धा म्हणून आयर्नमॅन स्पर्धेची क्रीडाविश्वात ख्याती आहे. या स्पर्धेत शारीरिक क्षमतेचा कस लागतो.तसेच खुप हिंमत आवश्यक असते. या स्पर्धेत सलग 3.8 कि.मी open water lake किंवा समुद्रात पोहणे, त्यानंतर लगेच 180 किमी सायकलिंग करणे व लगोलग 42.2 किमी धावणे. हे आव्हान 16 तासाच्या आत पूर्ण करणाऱ्यास "IRONMAN" हा खिताब बहाल केला जातो. भारताचे प्रतिनीधीत्व करत असताना हे आव्हान श्री.प्रसाद पाटील यांनी 13 तास 28 मिनिटात पूर्ण केले.

12 डीग्री तापमान, पूर्ण वेळ पाउस व वारा अशा हॅमबर्ग (जर्मनी) येथील अत्यंत प्रतिकुल परीस्थीत त्यांनी ही स्पर्धा पूर्ण केली.मेहनत ,जिद्द, कठोर परिश्रम व सातत्याच्या जोरावर त्यांनी ही स्पर्धा पूर्ण केली.तसेच महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागात अशी स्पर्धा पूर्ण करणारा पहिला अधिकारी ठरले.



**नाशिक ईजिनिअर्स जिमखाना नाशिक व्दारे**
**श्री.प्रसाद पाटील " IRONMAN" चे**
**अभिनंदन व कौतुक**

**हॅमबर्ग (जर्मनी) येथे दि.२९ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या IRONMAN triathlon' चे आव्हान ईजि.प्रसाद पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले असुन त्यांची काही आव्हानात्मक क्षणचित्रे ......दमदार यशाबद्दल पुनश्च अभिनंदन**











# *Quotes*..............................

The mind is the limit. As long as the mind can envision the fact that you can do something, you can do it, as long as you really believe 100 percent.

Arnold Schwarzenegger

Some people say I have attitude – maybe I do…but I think you have to. You have to believe in yourself when no one else does – that makes you a winner right there.

- Venus Williams

“I’ve failed over and over and over again in my life. And that is why I succeed.”

– Michael Jordan

“Without self-discipline, success is impossible, period.”

– Lou Holtz

“It isn’t the mountains ahead to climb that wear you out; it’s the pebble in your shoe.”

– Muhammad Ali

# जाता जाता ......महत्वाची सूचना..........

## ।। शरीरमाद्यम्  खलु धर्मसाधनम ।।

## नाशिक इंजिनिअर्स सोशल वेल्फेअर असोसिएशन, नाशिक, संचलित

**नासिक इंजिनिअर्स जिमखाना, नाशिक तर्फे**

**विनम्र आवाहन**

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष.......**

अभियंता म्हटले की, अचूकता, दर्जा व वेळेचे बंधन आणि वेळेची कमतरता, हे सर्व आलेच. त्यासाठी शरीर स्वास्थ्य देखील महत्वाचे ठरते. हे लक्षात घेऊन दिवसभराच्या वेळापत्रकात स्वत:च्या व कुटुंबाच्या फिटनेस साठी सुद्धा वेळ राखून ठेवलाच पाहीजे.

नाशिक इंजिनिअर्स सोशल वेल्फेअर असोसिएशन नाशिक ही मान्यता प्राप्त नोंदणीकृत संस्था असून  कतृत्व संपन्न व आरोग्यसंपन्न जीवनाची दिशा देणाऱ्या भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांची प्रेरणा घेऊन सन 2003 साली देशाच्या विकासासाठी आहोरात्र काम करणाऱ्या अभियंत्यांच्या  व त्यांच्या कुटूंबियांच्या आरोग्याचे संवर्धन कारण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना केली आहे.

सदर संस्थेत जलसंपदा, नाशिक महानगरपालिका, जिल्हा परीषद, भारत संचार निगम (बी एस एन एल,)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, टाऊन प्लानिंग, सार्वजानिक बांधकाम विभाग इ. विभागातील शासकीय अभियंते सभासद आहेत. सदर संस्थे मार्फत क्रीडा स्पर्धा, व्याख्याने व दरवर्षी वर्षा सहल आयोजित करण्यात येते.

निधी संकलन साठी संस्थेने हिंदी चित्रपट सृष्टीतील मान्यवर गायक (Bollywood Singer with classical touch ) यांचा गायनाचा कार्यक्रम करणे व रुपेरी पडद्यावरील प्रसिध्द सिलीब्रीटी यांना आमंत्रित करण्याचे नियोजन केले आहे , सदरचा कार्यक्रमास्थळी Screen वर जाहीराती दाखविण्यात येणार आहे. इच्छुक खाजगी व्यवसायिक संस्थांनी तसेच कंत्राटदार/ ठेकेदार अथवा संघटना यांना जाहीरात करावयाची किंवा द्यावयाची असल्यास त्यांनी कृपया नासिक इंजिनिअर सोशल वेल्फेअर असो. नासिकशी तात्काळ संपर्क साधावा ही विनंती

सदर निधीचा काही वापर सामाजिक कामे व Covid-19 Relief Fund साठी करण्यात येईल असा नाशिक ईंजिनिअर्स् जिमखाना, नाशिक यांचा सन २०२२ मधील सत्संकल्प आहे. तरी सर्वांनी यांस प्रतिसाद देवुन या कार्यांस हातभार लावावा अशी विनंती करणेत येत आहे.

**आपले विनित**

**डॉ.संजय बेलसरे (WRD),अध्यक्ष**

| | |
|---|---|
| **इंजि.पद्माकर भोसले (PWD),सह अध्यक्ष** | **इंजि.अशोक अव्हाड (MJP)सह अध्यक्ष** |
| **इंजि. नितीन वंजारी(NMC),उपाध्यक्ष** | **इंजि.अलका अहिरराव (WRD),उपाध्यक्ष** |
| **इंजि. प्रशांत सोनवणे(PWD),उपाध्यक्ष** | **इंजि. सुनील खुने(N MC),उपाध्यक्ष** |

**इंजि.सागर शिंदे (WRD)कार्याध्यक्ष**

**वेबसाईट व या मासिकामध्ये अनेक उपक्रम सुरू करणे प्रस्तावित आहेत . मा. अध्यक्ष व मा. कार्यकारीणी सदस्य तसेच संस्थेचे सभासदांचे अभिप्राय तसेच त्यांचे लेख ,Videos Photographs निबंध व पुस्तके या त्रैमासिक मासिकात तसेच वेब पोर्टलवर सुरू करणेत आलेले  आहे. तसेच  जाहिरात प्रसिध्दी दोन्ही ठिकाणी करणेत येणार आहे याबाबत मा. अध्यक्ष व मा. कार्यकारीणी सदस्य यांचा निर्णय व आदेश अंतिम राहतील .तरी सर्व सभादांनी यांचा लाभ घ्यावा .तसेच आपले अभिप्राय चांगले /वाईट द्यावे. तसेच सन्माननिय अध्यक्ष यांचे मार्गदर्शनात सदरची संस्था ही एकमेव व ऐतीहासिक असुन सदरची संस्था नावारुपाला आणुन संस्थेचे तसेच वैयक्तिक सर्वांनी हित साधावे ही विनंती ....संपादक**